**इयत्ता – दहावी (STD –X) :मराठी (009) (Marathi)**

**नमुना प्रश्न – पत्रिका : २०२१ – २२ ( Sample Paper 2021- 22 )**

---

प्रश्नपत्रिका सोडवण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा

१) या प्रश्नपत्रिकेचे एकूण ३ विभाग आहेत.

२) प्र. क्र - १ ते ६ - अपाठित गद्य आकलन. (दोन उताऱ्यावरील प्रश्नांपैकी कोणत्याही एका उतारावरील प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक आहे)

३) प्र. क्र - ७ ते ३० - व्याकरण (२४ पैकी कोणत्याही १८ प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक)

४) प्र. क्र - ३१ ते ५० - पाठ्यपुस्तकावर आधारित प्रश्न. (२० पैकी १६ प्रश्नांची उत्तरे आवश्यक)

५) या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण ५० प्रश्न आहेत. त्यापैकी ४० प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

६) प्रत्येक प्रश्नासाठी १ गुण आहे.

७) ही ४० मार्कांची प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी एकूण ९० मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

८) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमाप्रमाणे वर्तुळे दिली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तुळ उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा.
उदा . प्रश्न क्रमांक ६ च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्रमांक २ असेल तर तोच पुढील प्रमाणे नोंदवावा
प्रश्न क्र ६ 

९) खालीलप्रमाणे नोंदवलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नाला शून्य गुण दिले जातील. 

१०) प्रत्येक प्रस्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदवलेली उत्तरे व खडाखोड करून नोंदवलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत .

११) एकदा नोंदवलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत .

१२) पर्यायांची उत्तरे नोंदवताना फक्त बॉलपेनचा वापर करावा पेन्सिलने नोंदवलेली उत्तरे ग्राह्य धरता येणार नाहीत.

---

भाग – अ- उपयोजित लेखन

**प्रश्न 1 ते 6 साठी सूचना – खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा . (दोन उताऱ्यावरील प्रश्नांपैकी कोणत्याही एका उतारावरील प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक आहे)**

भारतरत्न, माजी राष्ट्रपती आणि शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. शिक्षणाबद्दल डॉ. राधाकृष्णन यांना अतिशय जिव्हाळा होता. शिक्षण क्षेत्रात अधिकाधिक विकास घडून यावा यासाठी ते आयुष्यभर प्रयत्नशील होते.चांगल्या शिक्षकांचा सन्मान हा संस्कृतीचा, सत्याचा व ज्ञानाचा सन्मान आहे. समाजाचा विकास सत्तेने होत नाही, यंत्राने होत नाही तर तो आदर्श शिक्षकांमुळे होत असतो. शिक्षकांचे महत्त्व असाधारण आहे हे जाणल्याशिवाय आपली तांत्रिक व यांत्रिक प्रगती होणार नाही.ज्या देशामध्ये शिक्षकाला सर्वत्र मान व प्रतिष्ठा असते. तेथील प्रज्ञावंत माणसे शिक्षण क्षेत्रातच अधिकाधिक आढळून येतात. असे देश सर्वांगीण प्रगती करू शकतात. समाजाला

CAREERINDIA

सुसंस्कृत करणारा शिक्षक हा देशाचा आधार आणि दिलासा आहे. त्यामुळे नागरिकांनी या पवित्र व्यवसायाचा सन्मान केला पाहिजे.एक कुलगुरू हा गुरुकुलाचा आद्य आचार्य असावयास हवा. ज्ञानाने, तपाने, चारित्र्याने तो सगळयांच्या अग्रस्थानी असावा. हे वाक्य कुलगुरू, प्राध्यापक, आणि एक शिक्षक म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना पूर्णतः लागू होते. एक शिक्षक शिष्याला ज्ञान देताना परिपूर्ण असावा असे त्यांचे मत होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी अनेक विषयांचा अभ्यास केला होता.डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतः एक उत्तम शिक्षक असल्यामुळे त्या पेशाबद्दल वाटणारे प्रेम आणि त्यासाठी केलेले ४० वर्षांचे कार्य यांचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने ५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिवस 'शिक्षकदिन' म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले.

1. डॉ.सर्वपल्ली राधा कृष्णन यांची जयंती कशाप्रकारे साजरी केली जाते? 1

   1. वाचन दिन 2. शिक्षक दिन 3. पर्यावरण दिन 4. पालक दिन

2. एक कुलगुरू कशाचा आद्य आचार्य असावयास हवा ? 1

   1. विद्यालयाचा 2. शाळेचा 3. गुरुकुलाचा 4. समाजाचा

3. शिक्षकाचा सन्मान हा कशाचा सन्मान आहे ? 1

   1. संस्कृती 2. सत्य 3.ज्ञान 4. वरील सर्व

4. समाजाला सुसंस्कृत करणारा शिक्षक देशासाठी काय असतो ? 1

   1. पाया व आधार 2.विकास व आधार 3. आधार व दिलासा 4.विकास व दिलासा

5. ‘सर्वात पुढे ‘ या शब्दाचा समानार्थी शब्द उताऱ्यात काय आला आहे ? 1

   1. शिरोस्थानी 2. पितृस्वरूप 3. मातृसमान 4. अग्रस्थानी

6. आदर करणे...... या वाक्प्रचारासाठी उताऱ्यात कोणता वाक्प्रचार आला आहे ? 1

   1. सन्मान करणे 2. साजरा करणे 3. दिलासा देणे 4. प्रतिष्ठा मिळवणे

**किंवा**

कुठलाही ऋतू हा निसर्गाचा सोहळाच असतो. खेड्यांमध्ये, लहान गावांत ऋतूपालट लगेच कळतो. आमच्या लहानपणी ऋतूंची छान सरमिसळ असायची. इंद्रधनुष्यातले रंग जसे एकमेकांत मिसळलेले असतात तशी. पाऊस संपला की, त्यातला हुरहुरता ओलावा घेऊन शरदाचे चांदणे फुलायचे. दवात भिजलेली पहाट पांघरूनच दिवाळी सरायची. त्या दवबिंदूंची शिरशिरी हवीहवीशी वाटत असतानाच थंडीचा काटा बोचायला लागला की, कळायचे हेमंती वारे वाहू लागल्याचे. थंडीचा हा गारठून टाकणारा अनुभव माघापर्यंत पुरायचा आणि शिशिराने गिरकी घेतली की वसंताची कळी खुलायची. फाल्गुनी हवेत रंगांची उधळण व्हायची. खरंतर संक्रांतीपासूनच एक गंध भुरळ घालायचा. तो म्हणजे आम्रमोहोराचा गंध! मोहोरानं डवरलेली आंब्याची झाडं आणि त्यावर चालणारं कोकिळकूजन हीदेखील ऋतुबदलाची नांदीच! धगधगत्या ग्रीष्माआधीचा हा वसंत मला सर्वाधिक आवडतो. वसंत म्हणजे गंधवतीच्या सर्जनाचा बहर. गंधवती म्हणजे पृथ्वी, आपली काळी आई आणि सर्जन म्हणजे निर्मिती. 'भरभरून देणे ' हा काळ्या मातीचा गुणधर्मच आहे. शेतातली तऱ्हेतऱ्हेची पिकं असोत को, चवीचवीची मोसमी फळं, फुलांचे गंधमधुर ताटवे असोत की, रुचिरभिन्न मसाल्याच्या वनस्पती...एकाच

www.careerindia.com

काळ्या मातीतून निसर्ग ही किमया घडवत असतो. सुगीचे दिवस आणि फाल्गुनातला उल्हास यामुळे या दिवसांत मन वाऱ्यावर लहरत असतं...पतंगासारखं!

1) फाल्गुनी हवेत कशाची उधळण व्हायची ? 1

1) गंधांची 2) रंगांची 3) विचारांची 4) यापैकी नाही

2) शिशिराने गिरकी घेतली की कोणाची कळी खुलायची? 1

1) वैशाखाची 2) ग्रीष्माची 3) वसंताची 4) हेमंताची

3) दवात भिजलेली पहाट पांघरूनच __________ सरायची 1

1) रंगपंचमी 2) होळी 3) यापैकी सर्व 4) दिवाळी

4) 'मन मोहून टाकणे' या अर्थाचा कोणता वाकप्रचार उताऱ्यात आलेला आहे? 1

1) कळी खुलणे 2) काटा बोचणे 3) भुरळ घालणे 4) सरमिसळ होणे

5) कुठलाही ऋतू हा कशाचा सोहळा असतो? 1

1) आनंदाचा 2) उत्सवाचा 3) सौख्याचा 4) निसर्गाचा

6) हेमंती वारे वाहू लागल्याचे कधी कळते? 1

1) थंडीचा काटा बोचला की 2) पाऊस संपला की

3) आम्र मोहराचा गंध आला की 4) कोकीळ कूजन सुरु झाले की

## भाग –ब – व्याकरण

**प्रश्न 7 ते 30 साठी सूचना –सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणत्याही १८ प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक)**

7) 'विद्वान' या शब्दासाठीचा स्त्रीलिंगी शब्द कोणता? 1

1) विदुषी 2) विधवा 3) विद्या 4) विद्वत्ता

8) खालील शब्दांपैकी पुल्लिंगी शब्द कोणता ? 1

1) तनया 2) सुता 3) जनक 4) देवता

9) खालीलपैकी एकवचनी शब्द कोणता ? 1

1) वाघ 2) चित्ता 3) हत्ती 4) सिंह

10) खालीलपैकी अनेकवचनी शब्द कोणता ? 1

1) गाडी 2) साल 3) शिष्य 4) पगडी

11) 'ऐट' या शब्दासाठी समानार्थाचा योग्य पर्याय निवडा. 1

1) शोभा 2) देखावा 3) माज 4) रुबाब

www.careerindia.com

CAREERINDIA

12) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ? 1

1) अपघात-घटना 2)अपाय- उपाय 3)अचल- स्थिर 4)अन्न-आग

13) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती? 1

1) नम्रता × उद्धट 2) आळशी × उत्साह

3) आज्ञा × अवज्ञा 4) आस्था × नास्तिक

14) 'अनुकूल' या शब्दासाठीचा योग्य विरुद्धार्थी शब्दाचा पर्याय शोधा. 1

1) अनुरूप 2) प्रतिकूल 3) विरूप 4) प्रतिघात

15) पुस्तक, फळा, वर्ग, शिक्षक या सर्व शब्दांना व्याकरणात काय म्हणतात ? 1

1)सामान्य नाम 2) विशेष नाम 3) भाववाचक नाम 4) सर्वनाम

16 ) गटात न बसणारा शब्द कोणता ? 1

1) धैर्य 2) कीर्ती 3) शूर 4) आनंद

17) रस्त्यावरून चालताना _____ डाव्या बाजूने चालावे.(वरील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य क्रियाविशेषण अव्ययाचा पर्याय शोधा.) 1

1) खाली ` 2) काल 3) दिवसा 4) सावकाश

18) जाईच्या मांडवा___ सूर्याची सोनेरी किरणे पसरली. (वरील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी अव्ययाचा पर्याय शोधा). 1

1) वर 2) नंतर 3) सुद्धा 4) पेक्षा

19) एक मिनिट ______ साठ सेकंद (वरील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा पर्याय शोधा.) 1

1) कारण 2) म्हणून 3) म्हणजे 4) पण

20) ____ ! केवढा हा महाकाय प्राणी ! (वरील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य केवलप्रयोगी अव्ययाचा शब्द वापरा.) 1

1) छान 2)बापरे 3)अरेरे 4)आहाहा

21) खालील वाक्यांपैकी वर्तमानकाळी वाक्य शोधा. 1

1) निसर्गासाठी सर्व समान असतात. 2) वसंत ऋतूत वृक्षांना पालवी फुटली.

3) बस गर्दीने खचाखच भरली होती. 4) भक्ती असेल तरच देव दिसेल.

22) 'रंगरंगोटी केल्यावर घर सुंदर दिसते' वाक्याचे योग्य भविष्यकालीन रूपांतर कोणते ? 1

1 ) रंगरंगोटी केल्याशिवाय घर सुंदर दिसत नाही 2) रंगरंगोटीने घर खराब दिसत नाही

3) रंगरंगोटी केल्यावर घर सुंदर दिसेल 4) रंगरंगोटी केल्यावर घर सुंदर दिसले.

www.careerindia.com

CAREERINDIA

23) 'दाणागोटा' या सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा आणि पर्याय निवडा. 1

1) इतरेतर द्वंद्व 2) समाहार द्वंद्व 3) वैकल्पिक द्वंद्व 4) अव्ययीभाव समास

24) खालीलपैकी गटाबाहेरचा शब्द कोणता ? 1

1) यथेच्छा 2) बिनशर्त 3) दारोदार 4) चातुर्मास

25) खालीलपैकी इतरेतर द्वंद्व समासाचे उदाहरण कोणते? 1

1) चौघडी 2) बारभाई 3) एकवीस 4) तीनचार

26) 'सत्यासत्य' या सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा व पर्याय निवडा. 1

1) इतरेतर द्वंद्व 2) अव्ययीभाव समास 3) समाहार द्वन्द्व 4) वैकल्पिक द्वंद्व

27) खालील वाक्याचे योग्य विधानार्थी वाक्यात रूपांतर करा. - मुलांच्या अभ्यासाची काळजी नको का ? 1

1) मुलांच्या अभ्यासाची काळजी करायची गरज नाही. 2) मुलांच्या अभ्यासाची काळजी नको.

3) मुलांच्या अभ्यासाची काळजी घ्यायला हवी . 4) मुलांच्या अभ्यासाची काळजी का करू नये ?

28) खालीलपैकी आज्ञार्थी वाक्य कोणते? 1

1) काय अक्षर आहे तुझे! ) मी मुख्यमंत्री झालो तर!

3) प्रत्येकाने नियमित शाळेत जावे. 4) परमेश्वरा, सगळ्यांना सुखी ठेव.

29) 'माधवचा अर्ज फेटाळण्यात आला'.-या वाक्याच्या विधानार्थी नकारात्मक रूपाचा योग्य पर्याय ओळखा. 1

1) माधवचा अर्ज नाकारण्यात आला. 2) माधवचा अर्ज स्वीकारण्यात आला नाही.

3) माधवचा अर्ज मान्य करण्यात आला. 4) माधवने अर्ज केला नाही.

30) खालील वाक्यातील विधानार्थी वाक्य कोणते? 1

1) धूम्रपान करू नये. 2) परवानगी शिवाय आत येऊ नका.

3) शिपायाला खोली स्वच्छ झाडायला सांगा. 4) केवढा गोंगाट करत आहेत ही मुले !

भाग – क–पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम

प्रश्न 31 ते 50 साठी सूचना **(२० पैकी १६ प्रश्नांची उत्तरे आवश्यक)**

प्रश्न 31 ते 43 योग्य पर्याय निवडा.

31) लेखक वाईला ________ अध्यक्ष म्हणून गेले होते. 1

1) शब्दकोशाचे 2) विश्वकोशाचे 3) व्युत्पत्तीकोशाचे 4) ज्ञानकोशाचे

32) "बटाट्याचं नाव काढू नकोस", हा सल्ला खालीलपैकी कोणत्या व्यक्तीने दिला? 1

1) काशिनाथ नाडकर्णी 2) बाबुकाका 3) कमलिनी कॅंकरे 4) सोकाजी त्रिलोकेकर

www.careerindia.com

CAREERINDIA

33) अब्दुलला चिठ्ठी कोणी वाचून दाखविली? 1

1) अन्वरने 2) शन्नुने 3) पोस्टमनने 4) रघुभैय्याने

34) लेखकांनी केलेली भीष्मप्रतिज्ञा __________ . 1

1) दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन.
2) दोन महिन्यात वीस पौंड वजन कमी करून दाखवीन.
3) दोन महिने अजिबात वजन वाढू देणार नाही .
4) दोन महिन्यात पन्नास पौंड वजन वाढवून दाखवीन.

35) शालीमुळे शालीनता _________.

1) कायम राहते 2) येते 3) जाते 4) शोभते

36) संक्रांतीचा दिवस अब्दुलला पर्वणीचा वाटे, कारण- 1

1) तपोवनातील स्त्रियांना बांगड्या भरल्याचे समाधान मिळत असे.
2) दुकानात भरपूर विक्री होऊन पैसे मिळत असे.
3) अब्दुलचे कुटुंब आनंदी असे.
4) अब्दुलला कुटुंबासोबत वेळ घालविता येत असे.

37) शाल या पाठाचे लेखक कोण? 1

1) पु. ल. देशपांडे 2) रा. ग. जाधव 3) नारायण सुर्वे 4) डॉ. प्रदीप आवटे

38) लेखकाच्या स्वयंपाकघरातून कोणत्या भाज्यांची हकालपट्टी झाली ? 1

1) फळभाज्या 2) सडपातळ 3) पालेभाज्या 4) बाळसेदार

39) सत्कारात अब्दुलला मिळालेल्या वस्तू......... 1

1) शाल व श्रीफळ 2) फुलांचा गुच्छ व फुलदाणी
3) रोख रक्कम व कपडे 4) नवीन बांगड्यांचा संच

40) बाबा बर्वे पंतांच्या समाचाराला आले नाहीत कारण? 1

1) उपास हे त्यांचे राखीव कुरण होते 2) त्यांचे पंताशी मतभेद होते
3) त्यांना 'उपास' ही कल्पना पटत नव्हती. 4) त्यांना उपास करणाऱ्यांचा राग येत असे.

41) भारतातील अणु संशोधनाचा पाया घालणारे __________. 1

1) डॉ. होमी भाभा 2) डॉ. अनिल काकोडकर
3) डॉ. विक्रम साराभाई 4) डॉ. रघुनाथ माशेलकर

42) मेटलायझिंग प्रक्रियेवर लेखकांनी यशस्वीपणे काम पूर्ण केले. या मागचे खालीलपैकी कोणते कारण असावे असे तुम्हास वाटते ? 1

1) वरिष्ठांच्या मदतीने लेखकांनी सगळी कामे पूर्ण केली.
2) वेल्डर व फोरमन यांच्या मदतीने लेखकांनी सगळी कामे केली.
3) लेखकांनी स्वतः यंत्रसामग्री हाताळून सर्व धडपड करून सगळी कामे केली .
4) लेखकांना ते काम करण्याची आधीपासून सवय होती.

www.careerindia.com

43) लेखक ट्रेनिंग स्कूलला गेले तेंव्हा 'बार्क' ही संस्था सुरु होऊन किती वर्ष झाली होती? 1
1) दोन 2) सात 3) पाच 4) चार

प्रश्न 44 ते 46 साठी – एका वाक्यात उत्तरे लिहा.

44) पक्षिणी जमिनीवर झेप का घेते ?
1. पिल्ले घरट्यात नाही हे बघून
2. पिल्ले जमिनीवर पडण्यापासून त्यांना वाचवण्यासाठी
3. पिलांचे रक्षण करण्यासाठी
4. पिलांवर नजर ठेवण्यासाठी

45) कवयित्रीला सैनिकांवरून काय ओवाळावेसे वाटते ?1
1. प्राण 2. ज्ञान 3. पैसा 4. जीव

46 ) द्रव्य या शब्दाचा अर्थ काय ? 1
1. संपत्ती 2. पैसा 3. धन 4. वरील सर्व

प्रश्न 47 ते 50 साठी – रिकाम्या जागा भरा.

47) नामा म्हणे मेघा जैसा | विनवतो ___ तैसा|| 1
1. चकोर 2. चातक 3. पावशा 4. चिमणी

48) धडाडत्या -----| तुझे पाऊल जिद्दीचे|| 1
1. बंदुकीतून 2. विमानातून 3. तोफांतून 4. रणगाड्यातून

49) वणवा लागतसे --- | पाडस चिंतित हरणी || 1
1. रणी 2. वनी 3. मनी 4. तनी

50) तुझी ----- दौड डोळे भरून पहावी || 1
1. पराक्रमाची 2. शौयाची 3. यशाची 4. विजयाची

www.careerindia.com